**आजचा शुभ विचार**

""बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-26 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Wednesday 28 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक २६ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ बुधवार, दि. २८ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## “महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक इतिहासाचे जिवंत प्रतीक”

### मुंबईतील लक्ष्मीनारायण मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त अमित शहा यांची उपस्थिती

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी मुंबईतील महत्त्वाच्या सांस्कृतिक आणि राजकीय कार्यक्रमांना उपस्थिती दर्शवली. यावेळी ते मुंबईतील माधवबाग येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिराच्या १५० व्या वर्धापन दिन सोहळ्यास उपस्थित होते. यावेळी त्यांच्या सोबत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित होते. यासंदर्भात अमित शहा यांनी एक्सवर (माजी ट्विटर) काही फोटो आणि एक पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे. एक्सवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये अमित शहा म्हणाले, “आज मी मुंबईतील माधवबाग येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरात पूजा केली. तसेच मंदिराच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांना उपस्थित राहिलो. धार्मिक श्रद्धेचे केंद्र असण्यासोबतच हे मंदिर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचे जिवंत प्रतीक आहे. मी सर्वांच्या कल्याणासाठी भगवान श्री लक्ष्मीनारायण यांना प्रार्थना केली.” दरम्यान या कार्यक्रमाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही एक्सवर पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये लिहिले आहे की, “माधवबाग येथील लक्ष्मीनारायण मंदिराच्या प्रत्येक कणात देव वास करतो! मुंबईतील माधवबाग येथील श्री लक्ष्मी नारायण मंदिराच्या १५० व्या वर्धापन दिन समारंभाला, आमचे नेते, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी उपस्थिती लावली.” या पोस्टमध्ये पुढे म्हटेले आहे की, “१८७५ मध्ये स्थापन झालेल्या माधवबाग येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिराच्या १५० व्या वर्धापन दिन सोहळयाला आज पुन्हा एकदा उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले. माधवबाग संस्था वेळोवेळी विविध सांस्कृतिक आणि लोककल्याणकारी कार्यक्रम आयोजित करून समाजसेवेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे.” “या संस्थेशी संबंधित असंख्य दानशूर व्यक्तींनी दिलेल्या उदार देणग्यांमुळे, गायींच्या सेवेपासून ते इतर कामांपर्यंत विविध सामाजिक सेवा उपक्रम येथे मोठ्या प्रमाणात राबविले जातात. भविष्यातही असेच लोककल्याणकारी काम करत राहावे यासाठी मी माधवबाग कुटुंबाला शुभेच्छा देतो. मी तुम्हाला खात्री देतो की जेव्हा जेव्हा त्यांना समाजसेवेसाठी सरकारकडून मदतीची अपेक्षा असेल तेव्हा आम्ही त्यासाठी नेहमीच तयार राहू”, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंत्री मंगल प्रभात लोढा, माधवबाग ट्रस्टचे मान्यवर व इतर मान्यवर उपस्थित होते.

## “अनादी मी, अनंत मी…”; या स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित गीताला पहिलावहिला छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने राज्य शासनाकडून प्रथमच राज्य प्रेरणागीत पुरस्कार घोषित झाल्यानंतर आज केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण “वर्षा” या शासकीय निवासस्थानी करण्यात आले.

**वीर सावरकर यांनी लिहिलेल्या गीताला पुरस्कार**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित “अनादी मी.. अनंत मी…” या गीताकरिता राज्य शासनाच्या “ छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार – २०२५” सोहळ्याकरिता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, आमदार संजय उपाध्ये, अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, संचालक विभीषण चवरे, स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचे रणजित सावरकर, श्रीमती अशीलता राजे, स्वप्निल सावरकर, मंजिरी मराठे, अविनाश धर्माधिकारी, आदी उपस्थित होते.

**वीर सावरकरांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी दोन लाखांचा धनादेश**

यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा_आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी दोन लाख रुपयांचा धनादेश स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्त करण्यात आला.

**आशिष शेलार यांनी यावेळी काय प्रतिपादन केलं?**

याप्रसंगी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.शेलार म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे जगण्याची आणि मरण्याची दोन्हीची प्रेरणा देते. त्यासोबतच, प्रचंड बुद्धिमत्तेने संभाजी महाराजांनी स्वतः साहित्य निर्मितीचे कार्यही फार उत्तम केले. त्यांनी ग्रंथही लिहिले, कविताही लिहिल्या. म्हणूनच, त्यांच्या नावाने राज्याचा पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला. स्वाभाविकच स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे 'अनादी मी, अनंत मी..' प्रचंड आत्मबळ असलेले गीत त्यांनी लिहिले आणि रचले. त्यामुळेच राज्य शासनाने हा पुरस्कार दिला असल्याचे मंत्री ॲड.शेलार यांनी यावेळी सांगितले.

## महाराष्ट्रातील शेतकरी आणि सर्व सामान्य जनतेसाठी आनंदवार्ता

### भारतात यंदा मुसळधार! सरासरीपेक्षा 106 टक्के अधिक पाऊस पडण्याची शक्यता

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



हवामान खात्याने जाहीर केलेल्या ताज्या अंदाजानुसार, यंदाच्या मोसमात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार आहे. मंगळवारी हवामान विभागाने सांगितले की, भारतात सरासरीपेक्षा १०६ टक्के जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. हा अंदाज एप्रिलमध्ये केलेल्या अंदाजापेक्षा जास्त आहे. भारतात दीर्घ कालावधीचा सरासरी पाऊस ८६८.६ मिमी आहे. हवामान खात्याने म्हटले आहे की २०२५ च्या मान्सून हंगामात (जून ते सप्टेंबर) संपूर्ण देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. याबाबत भारतीय हवामान विभागाने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे. हवामान विभागाने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, जून ते सप्टेंबर २०२५ दरम्यान देशाच्या ईशान्य आणि वायव्य भाग वगळता, भारतातील बहुतेक भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल. जूनमध्येच, देशात सरासरी १६.७ सेमीपेक्षा कमीत कमी ८% जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान आयएमडी जूनच्या शेवटच्या आठवड्यात जुलैमधील पावसाचा अंदाज जाहीर करणार आहे. गेल्या पाच वर्षांत, २०२२ आणि २०२४ असे दोनदा मान्सूनचे आगमन वेळेपूर्वी झाले आहे. आयएमडीच्या आकडेवारीनुसार, २०२२ आणि २०२४ मध्ये मान्सूनची सुरुवात अनुक्रमे २९ मे आणि ३० मे रोजी झाली होती. नैऋत्य मान्सूनची सामान्य सुरुवात १ जूनला होते. पण, नैऋत्य मान्सून एक आठवड्यापूर्वी २४ मे रोजी केरळमध्ये दाखल झाला आहे. पुढील २-३ दिवसांत महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि ओडिशाच्या काही भागात मान्सून पोहचण्याची शक्यता आहे. यामुळे, नैऋत्य मान्सून ईशान्य राज्यांच्या उर्वरित भागांमध्ये व पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या काही भागांमध्ये पुढे जाण्यासाठी हवामानविषयक परिस्थिती अनुकूल आहे. ओडिशा आणि मध्य भारतातील काही भागात पुढील चार दिवस अधिक पाऊस पडण्याची शक्यता असली तरी, अधिकाऱ्यांच्या मते, मान्सून दिल्ली आणि उत्तर भारताकडे जाताना मंदावण्याची शक्यता आहे. दिल्लीत मान्सूनच्या आगमनाची सामान्य तारीख जूनचा शेवटचा आठवडा आहे. दुसरीकडे महाराष्ट्र सरकारने, शेतकऱ्यांनी पेरणी सुरू करण्यापूर्वी काही दिवस वाट पाहावी असा इशारा दिला आला आहे. याचबरोबर कोअर झोन समजल्या जाणाऱ्या मध्य भारत, ओडिशा आणि राजस्थानच्या काही भागात शेती जवळजवळ पूर्णपणे पावसावर अवलंबून असते, या भागात यंदा सरासरीपेक्षा ६% जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे


**दैनिक स्वराज्यदूत**

या लोकप्रिय दैनिकाचे साक्री शहर प्रतिनिधी

**श्री. विनोद एकनाथ मोरे**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

संपादकीय मंडळ, सर्व वार्ताहर, प्रतिनिधी, जाहिरातदार प्रतिनिधी, वाचक आणि दैनिकाचे हितचिंतक



**शतायुषी हो बाळा..**

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७



अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या

**दैनिक स्वराज्यदूत**

या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी

आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

सम्पादकीय

# फादर ऑफ इस्लामिक बॉम्ब!

१९७४ साली भारताने अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर पाकिस्तानला स्वतःच्या सुरक्षिततेविषयी चिंता वाटू लागली. त्यानंतर पाकिस्तान त्या बाबतीत स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. पाकिस्तानचे त्यादृष्टीने गुप्तपणे प्रयत्न सुरूच होते. ज्या देशाशी (भारताशी) पाकिस्तानने तीन युद्धे लढली होती, त्या देशाकडे अणुबॉम्ब असणे ही गोष्ट पाकिस्तानची झोप उडवणारी होती. पाकिस्तानची अमेरिकेबरोबर घट्ट मैत्री असली तरी त्यांच्याकडून मिळणाऱ्या संरक्षणावर संपूर्णपणे अवलंबून राहणे योग्य नव्हते. त्यातच ११ आणि १३ मे १९९८ रोजी भारताने पुन्हा एकदा आपली अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर, पाकिस्तान स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. पाकिस्तानने त्यानंतर १५ दिवसांनी म्हणजे २८ आणि ३० मे रोजी आपली पहिली अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडली आणि संपूर्ण जगाला आश्चर्याचा धक्का दिला. अशाप्रकारे अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडणारा पाकिस्तान हा जगातील पहिला मुस्लीम देश ठरला. पाकिस्तानच्या अणुबॉम्बचे जनक होते, डॉ. अब्दुल कादीर खान. ए. क्यू. खान या नावाने पाकिस्तानमध्ये सुप्रसिद्ध असलेले अब्दुल कादीर खान हे एका रात्रीत पाकिस्तानी जनतेचे हिरो बनले. 'फादर ऑफ इस्लामिक बॉम्ब' या उपाधीने ते जगभर ओळखले जाऊ लागले. डॉ. अब्दुल कादीर खान यांचा जन्म १९३६ साली भारतातील भोपाळ (मध्य प्रदेश) येथे झाला होता. डॉ. खान यांचे वडील अब्दुल गफूर खान हे ब्रिटिश सरकारच्या शिक्षण मंत्रालयात एक अधिकारी म्हणून काम करत होते. १९४७ साली जेव्हा भारताची फाळणी झाली तेव्हा डॉ. खान यांचे कुटुंब पाकिस्तानमधील कराची या ठिकाणी स्थलांतरित झाले. डॉ. खान यांचे सुरुवातीचे शिक्षण लाहोर येथे झाले.त्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांनी कराची येथील एका कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर डॉ. खान यांनी कराची मेट्रोपॉलिटन कॉर्पोरेशनमध्ये नोकरी पत्करली. १९६१ साली मेटॅलर्जिकल इंजिनीअरिंगचा अभ्यास करण्यासाठी डॉ. खान यांनी टेक्निकल युनिव्हर्सिटी बर्लिन येथे प्रवेश घेतला. १९७२ साली डॉ. खान, ॲमस्टर्डम येथील फीजिक्स डायनामिक्स रिसर्च लॅबोरेटरीमध्ये सीनियर स्टाफ म्हणून रूजू झाले.ते फिजिक्स लॅबोरेटरीमध्ये काम करत असताना, युरेन्को ग्रुपने त्यांना सीनियर सायंटिफिक स्टाफमध्ये जॉईन होण्याची ऑफर दिली. ती ऑफर डॉ. खान यांनी आनंदाने स्वीकारली. युरेन्को ग्रुपमध्ये डॉ. खान यांच्याकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली. त्याच सुमारास म्हणजे जानेवारी १९७२ मध्ये पाकिस्तानने 'ॲटोमिक बॉम्ब प्रोजेक्ट' सुरू करण्याचा गुप्तपणे निर्णय घेतला होता. पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांच्या अध्यक्षतेखाली मुलतान येथे काही शास्त्रज्ञांबरोबर झालेल्या गुप्त बैठकीतवरील निर्णय घेण्यात आला होता. ॲटोमिक बॉम्ब प्रोजेक्ट हा भुत्तो यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली, तसेच पाकिस्तान ॲटोमिक एनर्जी कमिशनचे अध्यक्ष मुनीर अहमद खान यांच्या नियंत्रणाखाली राहणार होता. मुनीर अहमद खान यांनी ' प्रोजेक्ट - ७०६' या सांकेतिक नावाखाली युरेनियम एनरिचमेंट प्रोग्रॅमला सुरुवात केली होती. त्यावेळी ए.क्यू.खान हे नेदरलँडमध्ये युरेनियम एनरिचमेंट फॅसिलिटीत काम करत होते. १९७५ साली त्यांनी पाकिस्तान सरकारसाठी काम करण्याची आपली इच्छा प्रकट केली. पाकिस्तान सरकारने त्यांना पाकिस्तानमध्ये परतण्याची विनंती केली. त्यांनी पाकिस्तानमध्ये परतताना आपल्या बरोबर सेंट्रिफ्युजची ड्रॉइंग्ज आणली होती. त्यानंतर पाकिस्तानने खान यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या न्युक्लियर एनरिचमेंट फॅसिलिटीमध्ये ती सेंट्रिफ्युजेस ॲसेंबल केली. त्यानंतर युरोपमधील काही विकसित देशांकडून पाकिस्तानने अणुविषयक सामग्री आणि तंत्रज्ञान भूमिगत नेटवर्कच्याद्वारे प्राप्त केले. पाकिस्तानने आपला अणुविषयक कार्यक्रम अतिशय गुप्त राखला होता. १९७० च्या दशकात अणुविषयक कार्यक्रम तत्कालीन पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांच्या देखरेखीखाली होता.झुल्फिकार अली भुत्तो हे या बाबतीत ए. क्यू. खान यांच्याशी थेट संपर्क राखून होते. ए. क्यू. खान जितका मागतील तितका निधी त्यांना पुरवण्यात येत होता. त्याचे कोणतेही ऑडिट ठेवण्यात आले नव्हते. या कार्यक्रमाची सुरक्षा ए. क्यू. खान यांच्यावर सोपवण्यात आली होती. त्यानंतर झिया उल हक यांनी जेव्हा पाकिस्तानची सत्ता ताब्यात घेतली तेव्हा त्यांनीही ए. क्यू खान यांच्याशी थेट संपर्क ठेवला होता. १९८८ साली विमान अपघातात झिया यांचा मृत्यू झाल्यानंतर पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष गुलाम इशाक खान यांनी ती जबाबदारी लष्करप्रमुखांकडे सोपवली. त्यानंतर ए. क्यू. खान यांच्याशी थेट संपर्क साधण्याचे काम लष्करप्रमुख पाहू लागले.

# धुळे रेस्ट हाऊस घबाड मध्ये आमदार पीए की साबांवाले अडकणार?

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------



शहरतील गुलमोहोर रेस्ट हाउस मधील विधी मंडळ अंदाज समितीच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर गाजलेल्या कोट्यवधिंच्या घबाड प्रकरणी संशय व्यक्त होत आहे. हा प्रकार खरोखर सखोल तपास होवून त्याच्या लॉजिकल एन्ड पर्यंत जाईल, की ठरवून काला मोडला जाईल? या प्रश्नाचे उत्तर उभ्या महाराष्ट्रातील जनता शोधत आहे. प्रकरण गंभीर आहे, परंतु सरकार व खुद्द विधी मंडळाच्या प्रतिष्ठेचा मुद्दा यात गुंतलेला आहे, त्यामुळे या प्रकरणाला सरकार कसे - कसे हाताळते, खऱ्या दोषींना रेकॉर्डवर आणते की कुणाला बळीचा बकरा बनविले जाते ? याकडे राज्याचे बारीक लक्ष राहणार आहे. सदर प्रकरणाचा तपास स्थानिक पोलिस करोत, एसआयटी करो, सीआयडी करो, सीबीआय करो, इडी करो, की आणखी कुणी अतिउच्च अधिकार समिती करो, त्या सर्वांपुढे एक आव्हान राहणार आहे, ते म्हणजे इतर प्रकरणात एक बाधित तक्रारदार पक्ष असतो व एक आरोपी पक्ष असतो. अपवादात्मक काही प्रकरणात बाधित पक्ष तक्रार द्यावयास तयार नसतो, तो आरोपीस वाचवू पाहतो. उदा. एखाद्या परिवारात वर्ग एक ते पाच प्रकारातली खुनाची घटना घडली. परीवाराने म्हटले तकार द्यायची नाही. पण कायद्यापुढे असे चालत नाही. त्रयस्त व्यक्ति, पोलिस कर्मचारी तक्रारदार होतो व गुन्हा दाखल होतो. धुळयात घडलेला प्रकार हा काहीसा असा आहे. ज्यांच्या कडून दमात घेवून कोट्यवधि रुपये जमा करण्यात आले, त्या बाधित अधिकाऱ्यांची व ठेकेदारांची काही तक्रारच नाही. गोळा करणार्याचीही तक्रार नाही. म्हणजे यात ' मियाँ बिबी राजी तो क्या करेंगा काझी!' अशी प्रथमदर्शनी स्थिती आहे. तक्रारदार त्रयस्थ आहे. व्हिसल ब्लोअर आहे. असे असले तरी केवळ मियाँ बिबी राजी, असे म्हणून तपास यंत्रणांना हात झटकता येणार नाही. कायद्याप्रमाणे तक्रारदार हा देशाचा कोणताही नागरिक असू शकतो. राहता राहिला मियाँ बिबी राजीचा प्रश्न, तर त्यातही कायदा काम करतो. मियाँ बिबी राजी जरी असले तरी बिबी ही नियमाने १८ वर्षांवरील असावी लागते, हिंदू मियाँ ची दुसरी किंवा मुस्लिम मियाँची नियमापेक्षा अधिकची शादी नको, घटस्फोट - तलाक कायद्याने हवा असतो. त्याच प्रमाणे गुलमोहोर घबाड प्रकरणात घबाड देणारे व घबाड घेणारे यांची काही तक्रार नसली तरी एकावेळी किती कॅश बाळगता येते, देता येते याबाबतचे व त्या कॅशच्या उत्पन्नाचे सोर्स आयकर विभागाला सांगावेच लागतात. शिवाय परिस्थिती जन्य पुरावे तपासी यंत्रणेने कठोरपणे जमा केले तर इतके प्रचंड घबाड देणारे व घेणारे दोघेही ' सलाखों के पिछे ' नक्कीच जावू शकतील. फक्त सरकारच्या शिर्षस्थ नेत्यांची व जी काही तपासी यंत्रणा असेल त्यांची प्रामाणिक व जिद्दीने हे प्रकरण तडीस नेण्याची इच्छा पाहिजे. या तपास प्रकरणात पीए किशोर पाटील हा केंद्रबिंदू राहणार आहे. त्याचे सीसीटीव्ही फुटेज, सांबां कर्मचाऱ्यांचे जबाब, किशोरच्या मोबाईलचे सीडीआर, त्याने वापरलेल्या अन्य मोबाईलचे सीडीआर, त्या संदर्भात अंदाज समिती प्रमुख आ. अर्जुन खोतकर यांच्या मोबाईलवर किशोर पाटलांच्या बोलण्याचे सीडीआर, कलेक्टर ऑफिसच्या लॅन्ड लाईन वरून ज्या ज्या अधिकाऱ्यांना या पी.ए ने फोन लावले त्या फोन नंबर ची यादी व त्या यादितल्या अधिकाऱ्यांचे त्या - त्या रकमांची व्यवस्था करण्यासाठी संबंधितांना केलेल्या फोनचे सीडीआर, प्रेसकट नोटा बंडले कोणत्या ट्रेझरीतून - बँकेतून अदा झाल्या होत्या. कुणाला अदा झाल्या होत्या, त्याचे रेकॉर्ड. नोटांसाठी झडनभरच्या वर बॅगा धुळे किंवा अन्य कुठून त्या पी.एने खरेदी केल्या त्याचे रेकॉर्ड व बिले, खरेदी दुकानाचे असले तर सीसीटीव्ही फुटेज, किशोर पाटील वापरत असलेल्या गाडीच्या ड्रायव्हरचा जबाब - लॉग बुक, किशोर पाटलाच्या सोबतीला खाजगी व्यक्ती असेल तर त्याचा तपास, घबाड गोळा करायला ज्यांच्या ज्यांच्या कडे गेला त्या परिसरातील फुटेज, काही घबाड पजेरो गाडीतून आधिच गायब करण्यात आल्याचा आरोप आहे, त्या गाडीचा शोध घेणे. गायब केलेले हे घबाड जप्त करणे, यात ज्या ज्या शासकीय खात्यांचे नाव घेवून आकडे जाहिर करण्यात आले, त्या त्या विभाग प्रमुखांचे जबाब व त्यांनी घबाड दिल्याचे समोर आल्यास त्यांनाही आरोपी करणे, किशोर पाटील मुंबईत शासकीय कर्मचारी आहे. दौर्याच्या आधी आठवडाभर तो धुळयात कसा आला? त्याने कशासाठी खाजगी रजा वगैरे मागितली होती काय? किंवा समिती दौऱ्याच्या आधी आठवडाभर दौरा ठिकाणी पीएने जाण्याची नियमात तरतुद आहे काय? तसे नसेल तर त्याची रजा कुणी मंजुर केली? साबां विभागाने नियम तोडून त्यास तो १०२ क्रमांकाचा सुट इतके दिवस दिलाच कसा?साबां वाल्यांनी अर्ज घेणे नावावर सुट मंजुरी आदी प्रक्रिया न करता तसाच वरच्यावर हा सुट दिला होता काय? खुद्द समिती प्रमुख व पी.ए. किशोर पाटील हे गुलमोहोर रेस्ट हाउस व तेथील सुट नं.१०२ नाकारत आहेत. त्यावर कुणी विश्वास ठेवणार नाही. परंतु घडीभर त्यांचे नाकारणे गृहित धरले, तर मग संशयाची सुई सरळ सरळ सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वळते. साबां विभाग हा एरव्हीही ' महा मलईदार ' विभाग मानला जातो. सुट १०२ हा किशोर पाटलाच्या नावावर नसेल तर पर्यायाने तो साबां अधिकाऱ्यांच्या ताब्यात होता हे समोर येते. मग त्या सुट मधले ते घबाड साबां विभागाच्या अधिकाऱ्यांचे होते काय? ठेकेदारांकडून हा माल साबां विभागाने जमा केलेला होता काय? असा प्रश्न मग आपोआप तयार होईल. त्या घबाडची जबाबदारी साबां विभागावर येणार आहे. आ.अर्जुन खोतकर व पीए किशोर पाटलांना वाचवायला गेले तर (ते अशक्य वाटते) मग सरळ - सरळ साबां विभागाचे अधिकारी यात अडकणार आहेत. घबाड सापडले आहे. भरपूर पुरावा आहे. परिस्थिती जन्य पुरावा आहे. त्यामुळे तपासी यंत्रणा कोणतीही असो, त्यांना एकतर आ. अर्जुन खोतकर, किशोर पाटील यांच्या गळयात किंवा दबाव आलाच तर धुळयाच्या साबां विभागाच्या अधिकाऱ्यांच्या गळयात ही माळ घालावी लागेल. दोघां विभागांपैकीपैकी कुठल्यातरी एकाला सुट्टी नाही.

# येरगीत सैनिकांच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा रॅली संपन्न; रॅलीत संपूर्ण येरगी गाव सामील

## भारत माता की जय च्या घोषणांनी दुमदुमली येरगी नगरी

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्युत
---------------------



आज रविवारी तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी मध्ये सरपंच संतोष पाटील यांच्या वतीने भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले. यामध्ये गावातील लहानापासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण सामील झाले होते. सकाळी ८ वाजता गावातील हनुमान मंदिर पासून रॅलीची सुरुवात करण्यात आली. रॅली मध्ये भाजपा जिल्हाउपाध्यक्ष, सरपंच संतोष पाटील, मरखेल पोलिस स्टेशन चे पोलीस निरीक्षक आर.एम.हुंडेकर, बालिका पंचायत राज समितीचे सर्व पदाधिकारी , गावातील महिला पुरुष, लहान बालके, शालेय विद्यार्थी ,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हनुमान मंदिरापासून रॅली सुरुवात होऊन गावातील प्रत्येक रस्त्यावरून ही रॅली काढण्यात आली. रॅलीत भारत माता की जय, भारतीय सैनिकांचा विजय असो, अशा घोषणांनी येरगी गाव दुमदुमून गेले होते. तसेच देशभक्तीपर गाण्याच्या चालीवर रॅली काढण्यात आली. शेवटी रॅली गावातील प्रमुख रस्त्यावरून पुन्हा हनुमान मंदिराजवळ विसर्जित करण्यात आली.

तत्पूर्वी तेथे पोलिस निरीक्षक आर. एम.हुंडेकर, भाजपा, सरपंच संतोष पाटील, डाॅ.किरण ठाकरे, मुख्याध्यापक अशोक देवकत्ते, ईश्वर वाडीकर, तंटामुक्त अध्यक्ष, शालीय समिती अध्यक्ष, बालिका पंचायत राज समितीच्या उपसरपंच पुनम सूर्यवंशी, सचिव महादेवी दाणेवार, यांनी भारतीय सैनिकांच्या प्रति आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन ईरन्ना भुरळे यांनी केले. गावातील प्रतिष्ठित नागरीक उपस्थितीत होते.

# नंदुरबार जिल्ह्यासाठी पाच दिवसांचा हवामान अंदाज २५ ते ३० मे २०२५ पर्यंत ग्रीन अलर्ट

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराजदूत
--------------------



नंदुरबार जिल्ह्यासाठी २६ मे ते ३०मे २०२५ या कालावधीसाठी हवामान विभागाने ग्रीन अलर्ट जारी केला आहे. याचा अर्थ पुढील पाच दिवस जिल्ह्यात हवामान शांत आणि अनुकूल राहील, कोणत्याही मोठा धोका अपेक्षित नाही. दिवस नि हाय हवामान अंदाज, २६ मे २०२५ सोमवार ग्रीन अलर्ट हवामान शांत राहील कोणत्याही धोका नाही नागरिकांनी निवांत राहावे पण सजग असावे. २७ मे २०२५ मंगळवार ग्रीन अलर्ट नंदुरबार मध्ये हवामान अनुकूल राहिल पावसाचा धोका नाही. दैनंदिन कामकाज नेहमीप्रमाणेच सुरळीत पार पाडता येईल. २८ मे २०२५ बुधवार ग्रीन अलर्ट हवामानात कोणताही विशेष बदल अपेक्षित नाही, ते स्थिर राहील. नागरिकांनी हवामान खात्याच्या अधिकृत सूचना कडे लक्ष ठेवावे. २९ मे २०२५ गुरुवार ग्रीन अलर्ट.जिल्ह्यात हवामान सामान्य राहील. मात्र कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. ३० मे २०२५ शुक्रवार ग्रीन अलर्ट नंदुरबार जिल्हा सुरक्षित राहील आणि हवामानात फारसा बदल होणार नाही. शेती आणि इतर कामासाठी हा काळ योग्य आहे. महत्वाचे सूचना, राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आल्याने प्रवास करताना खबरदारी घेणे आवश्यक आहे. हवामान खात्याच्या सुचनानुसार आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# २८ मे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती स्वातंत्रवीर सावरकर महान देशभक्त

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ साली नाशिक जिल्ह्यातील भगुर येथे झाला. सावरकरांच्या मनात जन्मापासूनच देशभक्तीची भावना ज्वालामुखी सारखी धकधकत होती आणि जसे-जसे सावरकर मोठे होत गेले तसतशी स्वातंत्र्यासाठी मशाल प्रज्वलित होत होती.विर सावरकरांनी लाला लजपतराय,बाळ गंगाधर टिळक व विपिन चंद्र पाल या महान क्रांतिकारक महापुरुषांपासुन प्रेरणा घेऊन आपली वाटचाल सुरू केली आणि क्रांतीचा लढा सुरू ठेवला व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता भारताला स्वतंत्र मिळावे यासाठी स्वतंत्र लढ्याच्या कुंडात उडी घेतली.१८५७ च्या गनिमी संघर्षाच्या विद्रोहाचा अभ्यास केला.त्यावर आधारित एक पुस्तक लिहिले" द हिस्ट्री ऑफ व वॉर ऑफ इंडियन इंडिपेंडन्स" नावाच्या या पूस्तकाने इंग्रज प्रशासनाचे धाबे दणाणले. त्यामुळे हे पुस्तक इंग्रजांनी बेकायदेशीर ठरविले.परंतु सावरकरांच्या गनिमी काव्याने बिहारमध्ये हे पुस्तक लोकप्रिय झाले आणि स्वातंत्र्याची ज्वाला धकधकायला लागली.सावरकर आणि त्याचा भाऊ गणेश यांनी भारतीय परिषद कायदा १९०९ च्या विरोधात निदर्शने केली.यावर इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरविले व अटक वॉरंट जारी केला अटक होवू नये म्हणून सावरकर पॅरिसला गेले.नंतर १९१० मध्ये सावरकरांना इंग्रजांनी पकडले व न्यायालयाने त्यांना दोषी ठरवुन ५० वर्षांची शिक्षा ठोठावली. ४ जुलै १९११ ला काळ्या पाण्याची शिक्षा जाहीर झाली व अंदमान आणि निकोबार येथील सेल्युलर जेलमध्ये टाकण्यात आले.तेथे त्यांच्यावर इंग्रजांकडुन सतत अत्याचार होत होते.परंतु त्यांनी स्वातंत्र्य लढ्याचा धीर सोडला नाही आणि अनेक यातना सहन करीत इंग्रजांना बजाऊन सांगितले की मी जिवंत आहे तोपर्यंत देश स्वतंत्र झालेला आपल्याला दिसेल व आपल्याला भारत सोडून जावे लागेल आणि हे सावरकरांनी सिद्ध करून दाखविले ही महानता सावरकरांमध्ये दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत देशातील काही राजकीय पुढारी महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह, विद्वेषक व चिथावणी देणारे विधान करतांना दिसतात.ही बाब अत्यंत घृणास्पद व निंदनीय आहे. देशाच्या इतिहासात सावरकरांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे संबोधले जाते.म्हणजेच स्वातंत्र्यवीर ही पदवी पारतंत्र्यातील देशभक्तांनीच दिली ही बाब आक्षेपार्हय विधान करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. स्वातंत्रपुर्वकाळ अत्यंत खडतर आणि कठीण होता हे सर्वांनाच ठाऊक आहे.त्याकाळी स्वातंत्रवीर सावरकरांच संपूर्ण कुटुंब स्वतंत्र लढ्यात सहभागी होते.महाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष,साधु-संत, समाजसुधारक होवून गेले त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक तळागाळातील व्यक्तींनी आपले वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले आहे.तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले.परंतु देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जिवाची पर्वा न करता हसत-हसत फासावर सुध्दा चढले ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.सावरकरांचा काळ कसा होता किंवा त्यांनी स्वातंत्र्य लढा कसा उभारला ही बाब त्याकाळातील सहकाऱ्यांना व देशभक्तांनाच ग्यात असावी.परंतु आता सावरकरांच्या कर्तृत्ववावर कोणी राजकीय पुढारी चीखलफेक करीत असेल व आक्षेपार्ह विधान करीत असेल हे योग्य नाही असे मला वाटते.स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना झालेली काळ्यापाण्याची सजा आणि त्यांनी भोगलेल्या यातना यांचा इतिहास संपूर्ण शालेय पुस्तकांमध्ये लिखित आहे आणि हि शालेय पुस्तके आजची नसुन ७८ वर्षे जुनी आहे.या संपूर्ण पुस्तकांमध्ये अनेक विचारवंतांनी, थोरपुरूशांनी सावरकरांच्या कामाची प्रशंसा सुध्दा केली आहे. तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व स्वातंत्रवीर सावरकर नावाने संबोधले जावु लागले. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की स्वातंत्र्यवीर ही पदवी कोणालाही सहज मिळत नाही त्यासाठी त्याग करावा लागतो आणि सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व भारत स्वतंत्र झाला ही बाब त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्याकाळी अनेक उतार चढाव होते यात दुमत नाही.परंतु परिस्थिती नुसार प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पध्दतीने निर्णय घ्यायचे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक सुद्धा होते.यात जहालवादी, मवाळवादी, क्रांतिकारक अशा अनेक विचारधारांचे लोक होते.त्यामुळे आपसात मतभेद अवश्य असायचे परंतु मतभिन्नता नव्हती.त्यामुळे सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करून स्वतंत्र करने त्यापध्दतीने सर्वांनी आपआपले योगदान दिले व भारत १९४७ ला स्वातंत्र्य झाला.यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान होते. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ मध्ये झाला व त्याचा मृत्यू २६फेब्रुवारी १९६६ ला झाला.आज त्यांचा मृत्यू होऊन ५९ वर्षे झालीत आणि भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत मग आताच राजकीय पुढाऱ्यांना कसे काय आठवले की सावरकरांनी इंग्रजांना मदत केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा इतिहास महाराष्ट्रातील जनतेला, राजकीय पुढाऱ्यांना, पक्ष-विपक्षांना चांगल्या प्रकारे ग्यात आहे. त्यामुळे बाहेरच्या राजकीय पुढाऱ्यांनी महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल जास्त ग्यान देवु नये. कारण स्व.इंदिरा गांधीसह अनेकांनी सावरकरांचा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकर असा अनेकदा केला आहे ही बाब सावरकरांचा विरोध करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.थोरमहात्मे, क्रांतिकारक, स्वातंतासेनानी किंवा आपले पुर्वज ज्यांच्या कर्तृत्ववामुळे आपण खुला स्वास घेत आहे अशांबद्दल अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधान निघणार नाही याची काळजी सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी घ्यावी. सरकारला मी आग्रह करेल की स्वातंत्रवीर सावरकर यांच्या बद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल यानंतर कोणीही आक्षेपार्ह विधान केले तर त्यावर कठोर कारवाई करावी.सध्या देशात विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यामुळे सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ ला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी.त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.त्यामुळे विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांनी आपल्या जिभेवर आवर घालावा. जोपर्यंत सुर्य -चंद्र-तारे- आकाश-पाताळ आहे तोपर्यंत सावरकरांचे व संपूर्ण देशभक्तांचे नाव देशात स्वाभिमानाने घेतले जाईल.स्वातंत्रवीर सावरकरांना जयंती निमित्त माझा कोटी कोटी प्रणाम!जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर.**

## धुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे श्री. वनराज भिमराव पाटील यांचा राज्य शासनाचा गुणवंत पुरस्काराने सन्मान

संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------






यशवंतराव चव्हाण पंचायतराज अभियान २०२५ अंतर्गत अत्यउत्कृष्ट काम करणाऱ्या पंचायतराज संस्था आणि गुणवंत अधिकारी/कर्मचारी यांचा गौरव समारंभ स्वर्गिय यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मंत्रालय मुंबई या ठिकाणी थाटात संपन्न झाला. यावेळी धुळे जिल्हा परिषदेचे शिक्षण विभागात वरिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत असलेले वनराज भिमराव पाटील यांना राज्य शासनाचा गुणवंत पुरस्कार २०२३-२०२४ महामहिम श्री सी.पी.राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत ग्रामविकास मंत्री म मा.ना.जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले. यावेळी राज्यमंत्री श्री योगेश कदम, प्रधान सचिव श्री एकनाथ डवले, विभागीय आयुक्त कोकण श्री विजय सुर्यवंशी, पत्नी अनुपमा पाटील, मुलगी कावेरी पाटील व दृष्टी पाटील उपस्थित होते. ग्रामविकास विभागांतर्गत राज्य शासनाच्या तसेच केंद्र पुरस्कृत अनेक योजना व प्रकल्प राबविले जातात. अशा काही योजना/ प्रकल्प राबवितांना संबंधित कर्मचाऱ्यांचे प्रशासकीय तसेच तांत्रिक कौशल्य पणाला लागत असते, असे प्रकल्प पूर्ण करताना कर्मचाऱ्यांमध्ये विशेष वैयक्तिक कौशल्य व गुणवत्ता आढळून येते. अशा कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची योजना ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत सन २००५-२००६ पासून सुरू करण्यात आलेली आहे. श्री पाटील यांनी आस्थापना विषयक कामे उत्तमरित्या केलेली आहेत. त्यांनी एक विशेष मोहीम राबवून एकाच वेळी ४४३ कर्मचाऱ्यांना विविध सेवाविषयक लाभ देण्याचे काम केले होते. त्याचप्रमाणे जि.प. लिपिकवर्गीय कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून देखील कर्मचाऱ्यांचे हिताचे विविध सेवाविषय लाभ मंजुरीसाठी पाठपुरावा करीत असतात. सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती करणे, स्वच्छता अभियान राबविणे, रक्तदान शिबिर घेणे व स्वतःच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दरवर्षी नियमितपणे रक्तदान करणे, जि.प.मध्ये ग्रामीण भागातून येणाऱ्या लोकांना शासनाचे विविध योजनांची माहिती देऊन त्याची जनजागृती करणे, वृक्ष लागवड करणे, पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून पाणी आडवा पाणी जिरवा यासारखी अभियान ग्रामीण भागात राबविली आहेत. त्यांच्या जलसंधारणाच्या कामाची दखल खुद्द सिने अभिनेते अमिर खान व त्यांच्या पानी फाउंडेशन टीमने घेतली होती. त्यावर झी मराठी या वाहिनीवर एपिसोड दाखविण्यात आला होता. सुट्टीचा दिवस लोकाभिमुख कामासाठी खर्च करण्याची त्यांना आवड आहे. आणि म्हणून शासनाने त्यांच्या या अत्यउत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना "गुणवंत कर्मचारी पुरस्कार २०२३-२०२४" प्रदान केला आहे. यामुळे वनराज पाटील यांचे जिल्हाभरातून कौतुक व अभिनंदन होत

## धुळ्याच्या नूतन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी पदभार स्वीकारला

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



धुळेच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्त झालेल्या श्रीमती भाग्यश्री विसपुते यांनी जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार आज २७ मे रोजी स्वीकारला. जिल्हाधिकारी यांच्या दालनात जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी आज दुपारी धुळे जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारण्याची प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश शेलार यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संदीप पाटील, उपविभागीय अधिकारी (धुळे) रोहन कुवर, भूसंपादन अधिकारी सीमा अहिरे, बालाजी क्षिरसागर, चंद्रशेखर देशमुख, संजय बागडे, तहसलिदार (धुळे) अरुण शेवाळे, पंकज पवार, प्रवीण चव्हाणके, अपर तहसिलदार वैशाली हिंगे यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी औपचारिक ओळख करुन संवाद साधला.

## सॉलिसीटर गुलाबराव शेळके यांच्या स्वप्नपूर्तीसाठी श्रीमती सुमनताई शेळके यांच्या पॅनलला बहुमताने विजयी करा ! - हनुमंतराव जगदाळे

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------




सॉलिसीटर गुलाबराव शेळके यांच्या स्वप्नपूर्ती साठी बँकेच्या अध्यक्षा सुमनताई शेळके यांच्या पॅनलला बहुमताने विजयी करण्याचे आवाहन प्रसिद्ध उद्योजक हनुमंतराव जगदाळे यांनी केले आहे .जी एस महानगर बँकेच्या दि. १ जून रोजी होत असलेल्या निवडणुकीच्या प्रचारार्थ ठाणे सावरकर नगर येथील ठाकूर महाविदयालयात संस्थापक अध्यक्ष सॉ. गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके पॅनल च्या प्रचाराची सभा झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी ठाणे येथील प्रसिद्ध उद्योजक हनुमंत राव जगदाळे हे होते . तर प्रमुख पाहुणे जी एस महानगर बँकेच्या अध्यक्ष सुमनताई गुलाबराव शेळके या होत्या. हनुमतराव जगदाळे सभेला संबोधित करताना पुढे म्हणाले की , सॉलिसीटर गुलाबराव शेळके साहेब याच्या स्वपनपूर्तीसाठी श्रीमती सुमनताई शेळके यांच्या पॅनलला बहुमतानें विजयी करा . मुंबई महानगरातील चाकर मान्याच्या आर्थिक गरज पूर्तीसाठी कार्यरत असणारी आणि पारदर्शक कारभाराची, विश्वास प्राप्त आर्थिक व्यवहाराने उत्तरोत्तर प्रगतीचा इतिहास असणारी ही बँक आहे .ही बँक सुरक्षीत राहवयाची असेल , तर ती विदयमान अध्यक्ष श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षित राहुन शेळके साहेबाचे स्वप्नपूर्ती होईल. शेळके साहेब , उदयराव आणि स्वतः सुमनताई यांचा त्याग , त्यांचे वय याचा विचार करून, दिवंगत शेळकेसाहेब व उदयराव यांच्या निधनानंतर बँकेचा विचार करता निवडणूक व्हायलाच नको होती. पण एका विशिष्ट हेतूने एकत्रित आलेली ही मंडळी बँकेला अडचणीत आणल्या शिवाय रहाणार नाही. पण निरपेक्ष व कोणतीही अपेक्षा न उरलेल्या श्रीमती सुमनताईंच्या च हातात हीं बँक सुरक्षित राहील. हे एक प्रकारे मोठे धर्म युद्धच असल्यामुळे याला सामोरे जाणे आवश्यक आहे. आता आपण कोणताहीं विचार न करता आपल्या धनुष्य बाणाचा मारा सुरु करून युद्धाला सुरवात केली पाहिजे. आज आपली उपस्थिती पाहता विजय आपलाच आहे. माझ्या परिसरातील सभासद मतदारांची जबाबदारी आमची आहे. ती आम्ही शेकडा १०० टक्के पार पाडून आपला विजय साजरा करू अशी खात्री देतो. म्हूणन उपस्थित सभासद मतदारांनी रिक्षा निशाणीवर रबरी फुलीचा शिक्का मारून सुमनताईंच्या पॅनलला बहूमताने विजयी करा , असे आवाहन ही जगदाळे यांनी केले. या प्रसंगी बँकेच्या अध्यक्षा सुमनताई शेळके यांचा सत्कार करण्यात आला. सुमनताईनी सत्काराला उत्तर देताना रिक्षा चिन्ह असलेल्या माझ्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी निवडून द्या , असे अवाहन केले. यावेळी विनायकराव भुसारे पाटील , विष्णू भगत , अर्जून राऊत , व सुभाष पटाडे यांनी मनोगत व्यक्त केले . या प्रचार सभेचे डॉ . राजेश डेरे यांनी अतिशय सुंदर पद्धतीने सूत्रबद्ध रित्या सूत्रसंचालन केले. तदनंतर सर्व उमेदवाराचा परिचय करून देण्यात आला. शेवटी राष्ट्रगीत होऊन सभा संपन्न झाली .

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

PASSWORD PROTECTED PAGE